| MHYA210011332025 | म.सं.हिं.का.अर्ज क्र.२७/२०२५<br>आश्विनी वि. विशाल व इतर |
|---|---|

## निशाणी क्र.०२ वरील आदेश

अर्जदाराने मूळ अर्ज कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायद्यानुसार दाखल केला असून प्रस्तुतचा अर्ज सदर कायद्याचे कलम २३ प्रमाणे अंतरीम पोटगी मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. अर्जाचे समर्थनार्थ अर्जदार हिने प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे.

२. अर्जदार हिचे असे कथन आहे की, अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ यांचा विवाह त्यांच्या धर्माच्या रितीरिवाजाप्रमाणे दि.२७/०४/२०१८ रोजी ए.एस.एल लॉन, वणी ता.वणी, जि.यवतमाळ येथे झालेला आहे. सदर लग्न संबंध आजही कायम आहेत. अर्जदाराचे लग्न झाल्यानंतर ती सासरी नांदायला गेल्यानंतर तिला गैरअर्जदार यांनी काही दिवस चांगले नांदवले व त्यानंतर तिला तिच्या वडिलांकडुन प्लॉटची मागणी केली. त्यावेळेस तिने तिच्या वडिलांची प्लॉट घेण्याची परिस्थीती नसल्याचे गैरअर्जदारास सांगितले. परंतु गैरअर्जदार हे तिला त्या कारणास्तव शारिरिक व मानसिक त्रास देत होते. त्यानंतर त्यांनी तिला ०५ लाख आणण्यासाठी त्रास देणे चालु केले. तसेच गैरअर्जदार हे तिच्या चारित्र्यावरती संशय घेत असत. सदर अर्जात अर्जदाराने तिला होणाऱ्या मानसिक व शारिरीक त्रासाबाबत तिने दाखल केलेल्या निशाणी क्र.०१ वरील अर्जात कथन केलेले आहे. तसेच, सदर अर्जातील नमूद कलमान्वये भरपाईची मागणी

केली आहे. सदर अर्जाची चौकशी गुणवत्तेवर होण्यास काही कालावधी लागण्याची शक्यता असुन दरम्यान अर्जदाराचे पालनपोषण, अन्न, वस्त्र, निवारा तसेच औषधोपचार सर्व पुर्ण करण्यासाठी व मुलभूत गरज भागविण्यासाठी आर्थिक सहाय्याची अत्यंत तातडीची आवश्यकता आहे. तसेच गैरअर्जदार क्र.१ हा फोटोग्राफीचा व्यवसाय करत असुन तो अचल मालमत्तेची ब्रोकरशीप करत असुन त्यामधुन तो महिन्याकाठी ६०-७० हजार रुपये कमवितो. तसेच गैरअर्जदार क्र.३ हे एस टी विभागातुन निवृत्त झाले असुन त्यांना एकमुष्ट रक्कम मिळालेली आहे. तसेच त्यांचे मुळ गाव मोहुर्ली या ठिकाणी घर व शेती आहे असे कथन केले आहे. त्यामुळे गैरअर्जदार तिला पोटगी देवु शकतो. त्यासाठी गैरअर्जदार यांच्याविरुध्द अंतरिम आदेश अर्जदारांना तातडीने दरमहा रक्कम रु.१५,०००/- पोटगीच्या स्वरुपात गैरअर्जदार याच्याकडुन मिळावी म्हणुन तिने प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

३. गैरअर्जदार याने निशाणी क्र.१७ वरती पुरशिस दाखल करुन नि.क्र.१६ वरील सदर अर्जास ग्राह्य धरण्यात यावे असे कथन केले आहे. त्याने सदर अर्जास त्याचे म्हणणे दाखल केले आहे. गैरअर्जदार यांनी अर्जदाराच्या अर्जातील लग्नसंबंधाबाबतचा मजकूर व सदर लग्नसंबंधातुन असलेले नातेसंबंध मान्य केले आहेत व इतर अर्जदाराचे संपूर्ण कथन खोटे असल्याचे कथन केले आहे. गैरअर्जदार यांनी अर्जदार हिला कधीही, कोणत्याही प्रकारचा त्रास दिलेला नाही व त्यामुळे अर्जदाराला नुकसान भरपाई व ईतर रक्कम देण्याची आवश्यकता नाही असे कथन केले आहे. अर्जदार हिने फक्त

गैरअर्जदारास त्रास देण्यासाठी सदरील प्रकरण दाखल केलेले आहे. गैरअर्जदार पुढे असे कथन करतो की, त्यांचा विवाह हा प्रेम विवाह असुन अर्जदारास त्याच्या आर्थिक परिस्थितीची पुर्ण जाणीव होती. अर्जदाराचे वडिल हे खाजगी कंपनीमध्ये काम करत असुन अर्जदार ही लग्नापुर्वी उत्तरवार मशिनरी येथे अकाऊंटंट म्हणुन काम करत होती. अर्जदार ही लग्नानंतर नांदायला आल्यानंतर ते दोघे वेगळे किरायाने राहत होते व त्याचे आई वडिल हे त्याच्या भावाकडे राहत होते. लग्नानंतर अर्जदार ही उत्तरवार मशिनरी या ठिकाणी अकाऊंटंट म्हणुन काम करत होती तर गैरअर्जदार हा फोटोग्राफीचे काम करत होता. परंतु कोरोना महामारीमुळे त्याचा व्यवसाय बुडाला होता व त्याला फोटोग्राफीचे काम बंद पडल्यामुळे त्याला दुसरीकडे मजुरीने फोटोग्राफीचे काम करावे लागत आहे. गैरअर्जदार पुढे असे कथन करतो की, अर्जदार ही शिक्षीत असुन तिला संगणकीय ज्ञान आहे व आज रोजी ती कॅम गेमींग कंपनी, नागपुर येथे नौकरी करत असुन त्यामधुन तिला ३० हजार रुपये महिना मिळतो त्यामुळे ती तिचे स्वतःचे पालनपोषण करण्यास सक्षम आहे. याउलट तो वणी येथे किरायचे घरामध्ये राहत असुन त्याला नियमीत असे काम मिळत नाही. त्यामुळे अर्जदाराला पालनपोषणासाठी कोणताही वेगळा खर्च देण्याची गरज नाही.

४. गैरअर्जदार याची आर्थिक परिस्थिती जेमतेम आहे. गैरअर्जदार याच्यावर त्याच्या कुटूंबाची जबाबदारी आहे. तसेच गैरअर्जदार याच्याकडे त्या व्यतिरिक्त त्याच्याकडे कुठलेही उत्पन्नाचे साधन नसुन त्यामधुन त्याच्या वयोवृद्ध आई वडिलांची

पालनपोषणाची जबाबदारी तो पार पाडत आहे. अर्जदार क्र.१ ही गैरअर्जदारापासुन कुठलेही कारण नसतांना स्वमर्जीने वेगळी राहत आहे. अर्जदार हिने फक्त गैरअर्जदार यांना त्रास देण्यासाठी सदरील अर्ज दाखल केलेला आहे. तसेच अर्जदार ही तिच्या मर्जीने तिच्या माहेरी राहत असल्यामुळे तिचा अर्ज फेटाळुन लावण्यात यावा, अशी विनंती गैरअर्जदाराने केली आहे.

५. अर्ज आणि लेखी म्हणण्याचे अवलोकन केले. दोन्ही बाजूंच्या वकिलांच्या युक्तीवादाचे अवलोकन केले. प्रस्तुत अर्जाच्या निर्णयाकामी माझ्यासमोर पुढील प्रश्न उपस्थित होत असून खालील कारणमिमांसे आधारे मी त्यांचे निष्कर्ष त्यांच्या पुढे नोंदविले आहेत.

| अ.क्र. | प्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | प्रथमदर्शनी अर्जदाराचा गैरअर्जदारांनी कौटुंबिक हिंसाचार केला आहे काय ? | होय. |
| २. | अर्जदार स्वतःचे तसेच अर्जदाराचे पालनपोषण करण्यास असमर्थ आहे काय ? | होय. |
| ३. | अर्जदाराला अंतरिम पोटगीसाठी किती रकमेची आवश्यकता आहे ? | अर्जदारा करीता रक्कम रुपये ३,०००/- दरमहा अंतरिम पोटगी. |
| ४. | आदेश काय ? | अर्ज अशंतः मंजूर करण्यात आला. |

## का र ण मि मां सा

**प्रश्न क्र.१ ते ४ करीता –**

६. अर्जदाराचा अंतरिम पोटगी मिळण्यासाठीचा अर्ज व त्यावरील गैरअर्जदार यांनी दिलेल्या खुलास्यावरुन असे दिसून येते की, अर्जदार आणि गैरअर्जदाराने परस्परविरोधी कथने केलेली आहे. गैरअर्जदाराने अर्जदारांचा मानसिक छळ करुन कौटुंबिक हिंसाचार केला अथवा ती स्वेच्छेने माहेरी राहत आहे या आणि इतर मुद्दयांवर मूळ अर्जाच्या सुनावणी दरम्यान दोन्ही पक्षांतर्फे येणाऱ्या पुराव्यांवरुन अंतिम निकालाच्या वेळी निष्कर्ष काढण्यात येईल. त्यामुळे प्रस्तुत अर्जाचे स्वरुप पाहता, त्यात अर्जदार ही स्वतःचा उदरनिर्वाह करण्यास समर्थ आहे किंवा नाही तसेच ती मूळ अर्जाच्या अंतिम निकालापावेतो गैरअर्जदाराकडून अंतरिम पोटगीसाठी किती रक्कम मिळण्यास पात्र आहे एवढेच मुद्दे विचाराधीन आहे.

७. प्रथमदर्शनी अर्जाचा, तसेच नि.क्र.१ च्या अवलोकनावरुन अर्जदारांचा कौटुंबिक हिंसाचार झाला आहे असे दिसत आहे. अर्जाच्या अवलोकनावरुन असे दिसते की, अर्जदार हिचे लग्न गैरअर्जदार क्र.१ याचेसोबत दि.२६/०४/२०१८ रोजी झालेले आहे. लग्नानंतर अर्जदार हि सासरी नांदण्यासाठी गेली होती. लग्नानंतर गैरअर्जदाराने अर्जदाराला काही दिवस चांगले नांदवले व त्यानंतर तिला तिच्या वडिलांकडुन प्लॉटची मागणी केली. त्यावेळेस तिने तिच्या वडिलांची प्लॉट घेण्याची परिस्थीती नसल्याचे गैरअर्जदारास सांगितले. परंतु गैरअर्जदार हे तिला त्या कारणास्तव शारिरिक व मानसिक त्रास देत होते. त्यानंतर त्यांनी तिला ०५ लाख आणण्यासाठी त्रास देणे चालु

केले. तसेच तिच्या चारित्र्यावरती संशय घेवुन तिला शारीरिक व मानसिक त्रास देत असल्याचे दिसुन येत आहे. त्यामुळे ती दि.२१/०६/२०२५ पासुन अर्जदार हि तिच्या माहेरी राहत आहे.

८. गैरअर्जदार यांची परिस्थिती उत्तम असुन गैरअर्जदार हा फोटोग्राफीचा व्यवसाय करतो. तसेच तो ब्रोकरशिप करत असुन त्यामधुन तो ६०-७० हजार रुपये प्रतिमहिना कमवतो. तसेच त्याची मुळगावी घर व शेती आहे. त्यामधुन गैरअर्जदार यांचे चांगले उत्पन्न असुन त्यांची सामाजीक व आर्थिक परिस्थीती ही चांगली आहे. गैरअर्जदार याच्यावर अर्जदाराशिवाय कोणाचीही जबाबदारी नाही, त्यामुळे गैरअर्जदार हा अर्जदाराला सहज पोटगी देवु शकतो असे कथन केले असले तरी त्याबाबतचे आज रोजी कुठलाही पुरावा अभिलेखावर नाही. परंतु असे की, अर्जदाराची पालनपोषणाची जबाबदारी गैरअर्जदार याचीच आहे व तो त्यांच्या पालनपोषणाचा खर्च भरण्यास व भागविण्यास सक्षम आहे, असे कथन अर्जदाराने केलेले आहे. तसेच सदर कालावधीत गैरअर्जदार यांनी अर्जदारांच्या पालनपोषणाची कोणतीही व्यवस्था केलेली नाही. त्यामुळे अर्जदारांना पालनपोषणासाठी रक्कमेची आवश्यकता आहे. तसेच गैरअर्जदार हा अर्जदाराचा पती म्हणून तिच्या पालनपोषणाची नैतिक जबाबदारी गैरअर्जदार यास नाकारता येणार नाही. गैरअर्जदार याची जबाबदारी पाहता त्याने अर्जदारा करीता दरमहा रक्कम रुपये ३,०००/- ही अंतरिम पोटगीसाठी मूळ अर्जाचा अंतिम निर्णय होईपावेतो द्यावी, असा आदेश देणे योग्य होईल. सबब, मी प्रश्न क्र.१ व २ चे उत्तर 'होकारार्थी'

आणि त्या अनुषंगाने प्रश्न क्र.३ चे उत्तर देऊन प्रश्न क्र.४ करिता खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे :

## आदेश

१. अर्जदाराचा अर्ज अंशतः मंजूर करण्यात आला.

२. गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदारा करीता दरमहा रक्कम रुपये ३,०००/– अशी एकुण रक्कम अंतरिम पोटगीसाठी अर्ज दाखल तारखेपासून द्यावी.

३. उपरोक्त आदेश तात्पुरत्या स्वरुपाचा असून त्याचा अंमल मुख्य अर्जाचा निकाल लागेपर्यंत राहील.

४. गैरअर्जदार क्र.१ याने उपरोक्त आदेशाचे पालन न केल्यास तो कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियमातील तरतूदीप्रमाणे दंडात्मक कारवाईस पात्र ठरेल.

BIRADAR AMOL BALAJI
Digitally signed by BIRADAR AMOL BALAJI
Date: 2026.04.02 12:25:46 +0530

( ए. बी. बिरादार )

दिनांक – ३१/०३/२०२६

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.२,
वणी.

## Certificate

I affirm that the contents of this PDF file Order are same, word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | G.J.Bhadke |
| Name of Court | : | 2nd Jt.Civil Judge Junior Division, Wani. |